अन्न बहु कुर्वीत तद् व्रतम्

**महाराष्ट्र शासन**

**महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी**

**कार्यालय- सहाय्यक कुलसचिव (का.व्य./प्राधिकरण), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी**

**दुरध्वनी क्र. ०२४२६-२४३२२२**
**ई-मेल** - arofm.mpkv@gov.in

**पत्ता :- मध्यवर्ती परिसर, प्रशासकीय इमारत,**
**महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, ता. राहुरी,**
**जि. अहमदनगर. पिन- ४१३ ७२२**

---

विद्यापीठ निर्णय जा.क्र. एमटीजी-२ (१२२)/७५:२५/ ८८ /२०२०

दि. १० नोव्हेंबर, २०२०

<u>वाचा</u> - १. विद्यापीठ निर्णय एमटीजी-२ (१२२)/३/२०१९, दिनांक १८ जानेवारी, २०१९,
२. कार्यकारी परिषदेच्या ३२७ व्या बैठकीतील (विषय क्र. ११) ठराव क्र. ८/का.प.बै. ३२७ (१८.०२.२०२०),
३. उप-कुलसचिव (प्रशासन) यांचे पत्र जा.क्र. प्रशासन/ब-२/वाहन चालक/भरतीप्रमाण/७५:२५/१६९८/२०२०, दि. ८/९/२०२०.

## पार्श्वभूमी -

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत विविध विभागांमध्ये वाहनचालकाची मंजुर पदे संदर्भ क्र. १ च्या विद्यापीठ निर्णयाव्दारे निश्चित केलेल्या शैक्षणिक अर्हतेनुसार आणि नामनिर्देशनाचे व पदोन्नतीचे ९०%:१०% प्रमाणानुसार भरती केले जातात. तथापी, संदर्भ क्र. २ च्या कार्यकारी परिषदेच्या ३२७ व्या बैठकीत वाहनचालक या पदाचे सरळसेवा व पदोन्नतीचे भरती प्रमाणे ९०%:१०% ऐवजी ७५%:२५% असे सुधारीत करण्यात आलेले आहे.

## विद्यापीठ निर्णय -

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत विविध विभागांमध्ये वाहनचालकाची मंजुर पदे संदर्भ क्र. १ च्या विद्यापीठ निर्णयाव्दारे निश्चित करण्यात आलेल्या शैक्षणिक अर्हता व भरती प्रमाणाच्या आधारे भरणेत येत असतात. परंतु, संदर्भ क्र. २ च्या कार्यकारी परिषदेच्या ३२७ व्या बैठकीत वाहनचालक या पदाचे सरळसेवा व पदोन्नतीचे भरती प्रमाण ९०%:१०% ऐवजी ७५%:२५% असे सुधारीत करण्यात आलेले आहे. त्यानुसार व महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परिनियम १९९० मधील कलम ८८ (२ आणि ३) अन्वये मा. कुलगुरु महोदय यांना प्रदानीत करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन वाहनचालकाच्या सरळसेवेचे व पदोन्नतीचे प्रमाण ७५%:२५% असे करण्यास मान्यता प्रदान करीत आहे. संदर्भ क्र. ०१ च्या विद्यापीठ निर्णयातील इतर सर्व बाबी प्रकरणपरत्वे जशाच्या तश्या लागू राहतील.

सदरचा विद्यापीठ निर्णय नियंत्रक, म.फु.कृ.वि., राहुरी यांचे औपचारीक संदर्भ क्र. ६९१-व्हीसी, दि. ६/१०/२०२० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

**सही/-**
**(मोहन वाघ)**
**कुलसचिव**

**प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव -**

१. संचालक, विस्तार शिक्षण / संशोधन / शिक्षण, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी,
२. अधिष्ठाता (कृषि), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी,

३. सहयोगी अधिष्ठाता (सर्व),
४. विभाग प्रमुख (सर्व),
५. सहयोगी संशोधन संचालक (सर्व),
६. प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय (सर्व),
७. प्रभारी, कृषि संशोधन केंद्र / प्रकल्प (सर्व),
८. विद्यापीठ ग्रंथपाल / नियोजन अधिकारी, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी,
९. नियंत्रक / विद्यापीठ अभियंता, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी,
१०. उप कुलसचिव (प्रशासन) / (विद्या), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी,
११. अधिदान व लेखाधिकारी / सहाय्यक नियंत्रक / सहाय्यक कुलसचिव (सर्व),
१२. मा. कुलगुरु / कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.

**प्रत माहितीस्तव -**

१. सचिव, कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, नरीमन पॉईट, मुंबई ४०० ०३२,
२. सहसंचालक (प्रशासन), महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, १३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे ७.

AsPadvi

**(आशा पाडवी)**
**उप-कुलसचिव (प्रशासन)**